३१ ऑगस्ट ०३ तरुण भारत

# व्यावसायिक शिक्षणाला प्राधान्य द्यावे-पाटील



कमला कॉलेजमधील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या पहिल्या पदवीप्राप्त विद्यार्थिनीचा सत्कार करतना प्राचार्य क्रांतीकुमार पाटील. सोबत प्रा. नेताजी पवार, प्रा. अनंत पाटील, प्रा. प्रकाश चौगले, प्रा. पाटील

कोल्हापूर■

'पारंपारिक विद्यापीठातून शिक्षणाची संधी काही अपरिहार्य कारणामुळे उपलब्ध न झाल्यामुळे खचून न जाता मुक्त विद्यापीठाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आपले अपुरे शिक्षण पूर्ण करून जीवनातील यशाकडे वाटचाल करावी' असे आवाहन ताराराणी विद्यापीठाचे सचिव व कमला कॉलेजचे प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील यांनी केले.कमला कॉलेजमध्ये कार्यरत असणाऱ्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या पहिल्या पदवी प्राप्त विद्यार्थिनींच्या तुकडीचा गुणगौरव समारंभ प्रसंगी ते बोलत होते. यावेळी विद्यार्थ्यांच्यावतीने दवाणे, राऊळ यांनी मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. नेताजी पवार यांनी केले. सुत्रसंचालन प्रा. सुजय पाटील तर आभार प्रा. प्रकाश चौगुले यांनी केले.